| February 2025 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| SUN | MON | TUE | WED | THU | FRI | SAT |
| | | | 1 | 2 | 3 | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | **7** | 8 |
| 9 | 10 | **11** | 12 | **13** | **14** | **15** |
| 16 | 17 | 18 | 19 | **20** | 21 | **22** |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | **28** | |

# व्यापारी बंधूंनी घ्यावयाची दक्षता

**या शीर्षकाखाली चालू महिन्यात व पुढील महिन्यातील काही दिवसात विविध कायद्यांप्रमाणे जी दक्षता घ्यावी लागते त्याची माहिती दिली जाते. जरूर ती कामे वेळेवर करणे म्हणजे बऱ्याच त्रासापासून आपला बचाव करणे होय.**

## १. फेब्रुवारी २०२५ मध्ये आयकरासंबंधी करावयाची कामे

| दिनांक | कामाचा तपशील |
|---|---|
| **७ फेब्रुवारी** | **जानेवारी २०२५** मध्ये मुळातून करकपात केलेली रक्कम **टी.डी.एस.** आणि मुळातून करवसुली केलेली रक्कम **टी.सी.एस.** सरकारखाती भरावी. |
| **१४ फेब्रुवारी** | १) **डिसेंबर २०२४** मध्ये **कलम 194IA** प्रमाणे स्थावर मालमत्ता खरेदी करताना मुळातून करकपात केलेल्या रकमेचे **टीडीएस सर्टिफिकेट फॉर्म नं. 16B** मध्ये देण्याची शेवटची तारीख. |
| | २) **डिसेंबर २०२४** मध्ये **कलम 194IB** प्रमाणे व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाने भाडे देताना मुळातून करकपात केलेल्या रकमेचे **टीडीएस सर्टिफिकेट फॉर्म नं. 16C** मध्ये देण्याची शेवटची तारीख. |
| | ३) **डिसेंबर २०२४** मध्ये **कलम 194M** प्रमाणे व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाने ठेकेदाराला किंवा व्यावसायिकाला रक्कम देताना मुळातून करकपात केलेल्या रकमेचे **टीडीएस सर्टिफिकेट फॉर्म नं. 16D** मध्ये देण्याची शेवटची तारीख. |
| **१५ फेब्रुवारी** | १) **डिसेंबर २०२४** ला संपणाऱ्या तिमाहीचे टीडीएस सर्टिफिकेट **फॉर्म नंबर 16A** मध्ये द्यावे. |
| **कामगार कायदे** | : |
| **१५ फेब्रुवारी** | १) **जानेवारी २०२५** या महिन्याचा **प्रॉव्हिडंट फंड** भरण्याची शेवटची तारीख. |
| | २) **जानेवारी २०२५** या महिन्याचा **ई.एस.आय.** भरण्याची शेवटची तारीख. |
| **२८ फेब्रुवारी** | १) **जानेवारी २०२५** मध्ये **कलम 194IA** प्रमाणे स्थावर मालमत्ता खरेदी करताना मुळातून करकपात केलेल्या कराचे **चलन कम स्टेटमेंट फॉर्म नं. 26QB** मध्ये दाखल करण्याची शेवटची तारीख. |
| | २) **जानेवारी २०२५** मध्ये **कलम 194IB** प्रमाणे व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाने भाडे देताना मुळातून करकपात केलेल्या कराचे **चलन कम स्टेटमेंट फॉर्म नं. 26QC** मध्ये दाखल करण्याची शेवटची तारीख. |
| | ३) **जानेवारी २०२५** मध्ये **कलम 194M** प्रमाणे व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंबाने |

ठेकेदाराला किंवा व्यावसायिकाला रक्कम देताना मुळातून करकपात केलेल्या कराचे **चलन कम स्टेटमेंट फॉर्म नं. 26QD** मध्ये दाखल करण्याची शेवटची तारीख.

४) **आर्थिक वर्ष २०२५-२६** मध्ये भागीदारीत बदल करावयाचे असल्यास ₹ ५०० चा स्टँप पेपर खरेदी करून ठेवावा.

**टॅक्स प्लॅनिंग : उत्पन्नातून वजावट घेण्यासाठी कलम 80C मधील गुंतवणूक, पीपीअेफ, विमा, विशिष्ट म्युच्युअल फंड, पेन्शन स्कीममधील गुंतवणूक कलम 80CCD, कलम 80D हेल्थ इन्शुरन्स, कलम 80G सार्वजनिक संस्थांना देणगीची ३१ मार्च २०२५ पूर्वी पूर्तता करावी.**

**नोट : ज्या करदात्यांनी पॅन आधारसोबत जोडला नाही त्यांनी आयकर पत्रकाची अ‍ॅकनॉलेजमेंट आयकर पत्रक दाखल केल्यापासून ३० दिवसांच्या आत दाखल करावी.**

**(२) जानेवारी २०२५ मध्ये जीएसटी/व्यवसायकरासंबंधी करावयाची कामे**

| **दिनांक पर्यंत** | **कामाचा तपशील** |
|---|---|
| | **फॉर्म GSTR (1) [जानेवारी २०२५ साठी]** |
| **११ फेब्रुवारी** | १) मासिक पत्रक भरण्याचा पर्याय स्वीकारल्यास. |
| **१३ फेब्रुवारी** | १) ₹ ५० लाखापर्यंतची सर्व बिले B2B दाखल करावीत तिमाही पत्रकासाठी. |
| | **फॉर्म GSTR 3B [जानेवारी २०२५ साठी]** |
| **२० फेब्रुवारी** | १) मासिक पत्रक भरण्याचा पर्याय स्वीकारल्यास. |
| **२२ फेब्रुवारी** | १) तिमाही पत्रक भरण्याचा पर्याय स्वीकारल्यास. |
| **२८ फेब्रुवारी** | १) २०२३-२४ ची करदेयता १ लाखापेक्षा जास्त असल्यास **व्यवसायकराचे** फेब्रुवारीचे मासिक पत्रक भरा. |

✦✦✦